MHLA090000392026

# दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६/२०२६ मध्ये निशाणी क्र.१ खालील आदेश

(रणजीत तानाजीराव भोसले वि. निरंक)

१. अर्जदाराने स्वतःच्या व इतर वारसांच्या नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मंजूर होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराचे संक्षिप्त कथन असे की, अर्जदार नामे रणजीत तानाजीराव भोसले यांचे वडील नामे तानाजीराव रामराव भोसले यांचे दि.२६.०४.२०२५ रोजी मौजे हंडरगुळी, ता. उदगीर, जि. लातूर येथे निधन झालेले आहे. अर्जदाराचे असेही कथन आहे की, मयताच्या पश्चात सदर मयतास विधवा नामे रंजना तानाजी भोसले व अर्जदाराव्यतिरिक्त ३ मुली अनुक्रमे नामे ज्योती शाम पवार, स्वाती सचिन सोळंके व जागृती सुमंत देशमुख हे देखील कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदाराचे पुढे असेही कथन की, मयताची आई नामे लक्ष्मीबाई रामराव भोसले यांचे यापूर्वीच निधन झालेले आहे. अर्जदाराचे असेही कथन की, उपरोक्त नमूद वारसांशिवाय मयत तानाजीराव रामराव भोसले यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

३. अर्जदाराचे विशिष्ट कथन असे की, उपरोक्त मयताच्या मृत्यु पश्चात विविध शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी अर्जदारास मयत तानाजीराव रामराव भोसले यांच्या वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता अर्जदार हे संबंधित कार्यालयामध्ये गेले असता त्यांना सक्षम न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र आणण्याचे सूचित करण्यात आले. सबब, प्रस्तुत अर्ज.

४. अर्जदाराने अर्जातील कथनांच्या सत्यतेसाठी स्वतःचे साक्षीपुराव्याचे शपथपत्र नि.क्र.११ वर दाखल करून अर्जातील मजकुराचा पूनःउल्लेख केला आहे. तसेच उपरोक्त मागणी केल्याप्रमाणे म्हणजेच मयत तानाजीराव रामराव भोसले यांच्या वारसांच्या नावे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्याबाबत शपथेवर कथन केलेले आहे. अर्जदाराने नि.क्र.१२ सोबत मयत तानाजीराव रामराव भोसले यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, अर्जदार व इतर वारसांच्या आधारकार्डच्या प्रती आणि वारसांबाबतचे स्वयंघोषणा पत्र इ. दस्त अभिलेखावर दाखल करून नि.क्र.१३ वरील पूरसीस अन्वये त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

५. अर्जदाराने अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र दै. 'यशवंत' या दिनांक १०.०१.२०२६ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द केले. मात्र मूदतीत कोणीही

आक्षेप नोंदविलेला नाही.

६. उपरोक्त कागदपत्रांच्या अनुषंगाने व अर्जदाराच्या साक्षीपुराव्यावरून असे स्पष्ट होते की, तानाजीराव रामराव भोसले हे अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या तारखेस मयत झालेले आहेत; तसेच त्यांनी मृत्यूपत्र केलेले नाही. असे देखील स्पष्ट होते की, जाहीर प्रगटन दिल्यानंतर मूदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदाराने ते आणि उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद इतर ४ व्यक्ती हे मयत तानाजीराव रामराव भोसले यांचे वारसदार असल्याचे शपथेवर कथन केलेले आहे. येथे असे नमूद करणे आवश्यक आहे की, साक्षीदाराने उपरोक्त सर्व बाबी शपथेवर कथन केलेल्या आहेत, त्यामुळे त्यांच्या कथनांवर अविश्वास दाखविण्यासारखी कोणतीही परिस्थिती न्यायालयासमोर नाही. तसेच प्रस्तुत अर्ज हा अर्जदाराने मयत तानाजीराव रामराव भोसले यांचे वारसदार असल्याचे केवळ औपचारिकपणे मान्य करण्याकरिता दाखल केल्यामुळे अर्जदाराची गरज लक्षात घेवून त्यांना तसे औपचारिकपणे वारस मान्य करणे गरजेचे आहे. सबब, अर्जदार व परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद इतर ४ व्यक्ती हे मयत तानाजीराव रामराव भोसले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देणे योग्य व न्यायाचे होईल. अंततः खालील आदेश पारीत करण्यात येत आहे:

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेले अर्जदार आणि इतर ४ वारसदार हे मयत तानाजीराव रामराव भोसले यांचे कायदेशीर वारस आहेत, असे औपचारिकपणे मान्य करण्यात येते.

३. उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेले अर्जदार आणि इतर ४ वारसदार हे मयत तानाजीराव रामराव भोसले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे विहित नमुन्यातील वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) हे अर्जदाराने आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

४. मुंबई नियमन ८, १८२७ चे कलम ७ प्रमाणे तसेच दिवाणी नियमावलीचा परिच्छेद क्र.३१२ प्रमाणे प्रस्तुत प्रमाणपत्रावर तशी टीप नमूद करावी.

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2026.03.13 17:15:28 +0530

दिनांक : १३.०३.२०२६ (भालचंद्र रा. झेंडे)

ठिकाण : उदगीर. ३ रे सह–दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), उदगीर.